**गट विकास अधिकारी यांनी तालुका पातळीवर दर ३ महिन्यांनी सरपंच सभा घेण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**ग्रामविकास विभाग**
**शासन परिपत्रक क्रमांकः व्हीपीएम- २०२०/प्र.क्र. १६१/पंरा-३**
बांधकाम भवन, २५ मर्झबान पथ
फोर्ट, मुंबई - ४०० ००१
तारीख: ०९ फेब्रुवारी, २०२१

**शासन परिपत्रक :-**

ग्रामपंचायतीची कामे वेळेवर होत नसल्याबाबत अनेक तक्रारी / निवेदने शासनास प्राप्त झाली आहेत. याबाबी विचारात घेऊन राज्यात सर्व जिल्ह्यात तालुका पातळीवर गट विकास अधिकारी यांना खालीलप्रमाणे कार्यवाही करण्याबाबत सूचना देण्यात येत आहेत.

१) ग्रामपंचायतीची कामे वेळेवर होण्यासाठी गट विकास अधिकारी यांनी तालुका पातळीवर सरपंच सभा आयोजित करावी.

२) सदर सभेत संबंधित पंचायत समिती विस्तार अधिकारी (पंचायत) व इतर कर्मचारी, संबंधित सरपंच, ग्रामसेवक यांची आढावा बैठक घेण्यात यावी व ग्रामपंचायतीची कामे वेळेवर होत नसल्याच्या तक्रारी/ गाऱ्हाणी/ अडचणींची सोडवणूक करावी.

३) सदर सभा दर ३ महिन्यांनी नियमितपणे आयोजित करावी व ज्या दिवशी तक्रार निवारण दिन आहे त्याच दिवशी सदर सभेचे आयोजन करावे.

४) गट विकास अधिकारी यांनी सभा घेतल्यानंतर कार्यालयीन कामकाजाच्या पाच दिवसात सभेचा अहवाल मुख्य कार्यकारी अधिकारी यांना सादर करावा.

५) सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी संबंधित गट विकास अधिकारी यांच्याकडून सदर सभेचा अनुपालन अहवाल एकत्र करून संबंधित विभागीय आयुक्त यांना सात दिवसात सादर करावा.

६) सर्व विभागीय आयुक्त यांनी विभागातील सर्व जिल्ह्यातून झालेल्या सभेचा अनुपालन अहवाल प्राप्त करून एकत्रितपणे शासनास दहा दिवसात सादर करावा.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने .

सुहास जाधवर
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,
१. मा. मंत्री (ग्रामविकास), यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
२. अतिरिक्त मुख्य सचिव (ग्रामविकास व पंचायत राज), यांचे स्वीय सहायक, बांधकाम भवन, २५ मर्झबान

पथ, फोर्ट, मुंबई - ४०० ००१

३. सर्व उपसचिव/ अवर सचिव/ कक्ष अधिकारी, ग्रामविकास विभाग, मंत्रालय, मुंबई

४. विभागीय आयुक्त, कोकण , नाशिक, पुणे, औरंगाबाद, नागपूर, अमरावती

५. मुख्य कार्यकारी अधिकारी , जिल्हा परिषद (सर्व)

६. गट विकास अधिकारी, पंचायत समिती (सर्व)

७. निवड नस्ती कार्यासन पंरा-३